: प्रकरण सहावे :

# समारोप

: प्रकरण सहावे :

# समारोप

पुरूषप्रधान संस्कृतीमुळे लिंगभेदावर आधारित संस्कृती व संस्कारामुळे स्त्रियांचे कार्यक्षेत्र मर्यादित झाले. एकंदरीत स्त्रियांच्या स्थानाकडे पाहिल्यास असे दिसून येते की स्त्री म्हणजे अबला, परावलंबी, नाजूक, चूल व मूल हे त्यांचे कार्यक्षेत्र त्या रिंगणाबाहेर पडूच नयेत अशी वैचारिक तटबंदी उभी करण्यात आली. नीती, त्याग, पावित्र्य, सहनशीलता, कुलीनता, शालीनता या गुणांचा मक्ता स्त्रियांकडे दिला. याचा परिणाम असा झाला की स्त्रियांचे दास्य, परावलंबी वृत्ती, निर्णयात कमकुवतपणा वैचारिक गुलामगिरी, व्रतवैकल्यांचा पगडा घट्ट झाला. या गोष्टीमुळे स्त्रियांचे समाजातील सर्व क्षेत्रातील स्थान हे संकुचित होत गेले. काळाच्या ओघात परिस्थितीनुसार त्यात बदल होत गेले. 18 व्या शतकापासून जास्त प्रमाणात स्त्रियांची परिस्थिती काही समाजसुधारकांना जाणवू लागली. राजाराम मोहनरॉय, पं. ईश्वरचंद्र विद्यासागर, म. फुले, सावित्रीबाई फुले, न्या. रानडे आगरकर, म. कर्वे, म. गांधी, आंबेडकर इ. च्या उदार-विशाल दृष्टीकोनामुळे स्त्रीस्वातंत्र्ययुगाचा प्रारंभ झाला. या युगाचा पहिला उद्गार म. फुल्यांनी काढला. त्यांचा एकूणच विचार हा मानवी स्वातंत्र्याकडे व समतेकडे नेणारा होता. भारतातील परंपरागत समाज संस्थांच्या विरुद्ध बंड करणारे ते पहिले सुधारक होत.

मागील दिडशे वर्षापासून महाराष्ट्रामध्ये जे समाजसुधारणेचे आणि धर्मसुधारणेचे आंदोलन चालू आहे आणि यामध्ये जे कार्य केले जात आहे त्यामध्ये फुल्यांचे योगदान अनन्य साधारण आहे. त्यांचे विचार हे क्रांतिकारक समाजसुधारणेला प्रेरक असेच होते. स्त्रीशिक्षण, शूद्रअतिशूद्रांचे शिक्षण, विधवा विवाहस प्रोत्साहन, जातिभेदांचे खंडन, अस्पृश्यता निर्मूलन, बालहत्या प्रतिबंध, अंधश्रद्धा आणि वाईट प्रथा, रूढी, परंपरा यावर कडाडून हल्ला हे त्यांचे प्रमुख कार्य आहे. समाजात ब्राह्मण वर्गाचे वर्चस्व

होते. त्यांनी निर्माण केलेल्या रूढी, परंपरा होत्या. तिरस्कार केल्या जाणाऱ्या अनेक जाती-उपजाती होत्या. त्यांच्यामध्ये परस्पर समतेचा अभाव होता. धर्माच्या नावावर नैतिकेचे अध:पतन होत होते. त्यास समाजच जबाबदार होता. फुल्यांनी अनितीमान ब्राह्मणांवर ज्या त्वेषाने ओरखडे ओढले त्याच तत्परतेने अनितीमान ब्राह्मणेत्तरांनाही धारेवर धरले. याशिवाय बहुजन समाजाचे असलेले इतर प्रश्न ही त्यांनी हाताळले. तसेच स्त्री प्रश्नांना ही त्यांनी तितकेचे महत्त्व दिले. याच त्यांच्या प्रश्नांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न या लघुशोध निबंधात केला आहे.

*महात्मा जोतिबा फुले यांच्या विचारातील स्त्रीवाद या लघुशोध निबंधाच्या पहिल्या* प्रकरणामध्ये वेदपूर्व काळापासून म. फुलेंच्या काळापर्यंतच्या एकूणच स्त्रियांचे स्थान व त्याचे बदलते स्वरुप आणि त्याचा संस्कृती व धर्माशी असलेला निकटचा संबंध आणि यासर्व बाबींचा नेमका एकत्रित परिणाम समाजाच्या स्त्रीयाबाबतच्या वैचारिकतेवर काय झाला याचा उहापोह केलेला आहे.

म. फुल्यांनी आपल्या एकूणच विचारात जेंव्हा जेंव्हा स्त्रियांसंदर्भात विचार मांडले तेंव्हा स्त्रियांच्या अध:पतनास वा दास्यत्वास समाजातील प्रमुख घटकाची भूमिका बजावणाऱ्या कुटुंबसंस्थेत व त्यातल्या त्यात भारताच्या बहुतांश भागात अस्तित्वात असलेल्या पितृसत्ताक कुटुंब पद्धतीस जबाबदार धरलेले आढळून येते. यासाठी त्यांनी कुटुंबसंस्थेच्या सुरूवातीपासूनचा विचार केलेला दिसून येतो. 'सत्सार', 'सार्वजनिक सत्यधर्म' अखंडादी काव्यरचना या त्यांच्या विविध लिखाणातून प्रकट झालेल्या विचारांचा परामर्श या प्रकरणातून घेतलेला आहे शिवाय त्यांनी या कुटुंबसंस्था बाबतीत सुचविलेल्या उपाययोजनांचाही विचार केलेला आहे.

म. जोतिबा फुले यांचे स्त्री शिक्षणाचे कार्य' या तिसऱ्या प्रकरणामध्ये फुल्यांच्या एकंदरीत स्त्री विषयक विचारांचे विवरण व मूल्यमापन करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचा शिक्षण विषयक

दृष्टीकोन हा बहुजन समाजाच्या, स्त्रियांच्या, दलितांच्या मुक्ती लढ्याचे पहिले पाऊल होते, शिक्षण म्हणजे समाज क्रांतीची तयारी असा त्याचा अर्थ होता. अज्ञान हेच गरीबी व शोषणाचे मूळ कारण आहे हे त्यांनी जाणले. म्हणूनच त्यांनी शिक्षणाची सुरूवात स्वत:च्या पत्नीला शिकविण्यापासून केली. भारतीय परंपरेने स्त्री शूद्रांना एकाच मापात घालून शिक्षणापासून वंचित केले होते. ख्रिस्ती धर्मातील मानवतावाद तसेच ख्रिस्ती धर्मोपदेशकांचे व्यक्तीत्व आणि कार्यपद्धती याची त्यांच्या मनावर विशेष छाप पडली. सामाजिक स्थिती आणि विविध ग्रंथवाचनाने फुल्यांच्या लक्षात आले की कोणत्याही सुधारणेचा पाया विद्या होय. त्यांनी आपल्या सार्वजनिक जीवनाचा प्रारंभ हा स्त्री शिक्षण कार्यानेच केला. आपल्या नव्या इमारतीचा कारागिर हा पाळण्यापासून तयार झाला पाहिजे. पण जिच्या हातात पाळण्याची दोरी आहे ती मात्र युगानुयुगे अज्ञानीच आहे. त्यामुळे अर्धेकच्चे ज्ञान असणारी मुले ही मानवी स्वातंत्र्याचा संदेश घराघरापर्यंत कसे पोहोचविणार ? त्यासाठी मुळात आधी पायाच पक्का करण्याचे त्यांनी ठरविले. म्हणूनच प्रथम ते स्त्री शिक्षणाकडे वळले. मुले आईच्या तालमीत तयार होतात. स्त्रिया लहान वयात मुलांना जे वळण लावतात त्यातच त्यांच्या शिक्षणाची बीजे आहेत याला अनुसरुनच देशातील माता प्रथम शिक्षित असण्यास हवे. असा त्यांचा दृढ निश्चय झाला. त्यांच्या या स्त्रिशिक्षणाच्या महत्व सांगण्यावरुन स्त्री शिक्षण कुटुंबापुरतेच मर्यादित अशी त्यांची शिक्षण विषयक भूमिका असेल असे वाटते. असे जरी असले तरी त्याकाळातील परिस्थिती पाहता त्यांच्या कार्याची, विचाराची पद्धती फारच सुधारक वाटते. तसेच ज्या पद्धतीने सावित्रीबाईंना त्यांनी शिक्षित करून शिक्षिका बनविले त्यावरुन त्यांनी स्त्री ही कर्तबगार असते हेच सिद्ध केल्याचे वाटते. या कृतीवरून स्पष्ट होते की स्त्री ही केवळ कुटबांच्या उद्धारासाठीच उपयुक्त न ठरता ती सामाजिक उद्धाराच्या कार्यामध्ये सुद्धा पुरूषांच्या बरोबरीने सहभागी होऊ शकते आणि तरच समाजाचा विकास घडू शकतो असा संकेतात्मक विचार त्यांच्या कृतीमधून स्पष्ट होतो. त्यांना त्याकाळात अभिप्रेत असलेल्या शिक्षणाच्या दृष्टीकोनाचा

परिणाम 20 व्या शतकात चांगलाच झालेला दिसतो. त्यांच्या कार्याने प्रेरित होऊन महर्षि धोंडो केशव कर्वे यासारखे स्त्री शिक्षणाच्या कार्यात स्वत:ला वाहून घेणारे शिक्षण महर्षि निर्माण झाले. तर कर्मवीर भाऊराव पाटीलां सारख्या व्यक्तींनी फुल्यांच्या प्रेरणेने तळागाळातील लोकांसाठी ज्ञानदानाचे कार्य हेच आपले जीवन ध्येय ठेवले. फुल्यांचे मत उच्च शिक्षणावर कमी खर्च व प्राथमिक शिक्षणावर अधिक व्हावे असे होते. आणि याच विचारांच्या प्रेरणेने कर्मवीर भाऊराव पाटील यांनी तळागाळातील लोकांचे प्राथमिक शिक्षण हे आपले लक्ष्य बनविले.फुल्यांचे कुटुंबापुरतेच मर्यादित असलेले शिक्षण विषयक विचारा मात्र नंतरच्या काळात मोठीच झेप घेतल्याचे महर्षि कर्व्यांच्या कार्यावरुन दिसते. यावरुन स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये स्त्री शिक्षण व बहुजन समाजाच्या शिक्षणाला वाचा फोडणारे पहिले पुरूष महात्मा फुलेच होत.

भारतीय स्त्रियांना शिक्षणाचे दरवाजे खुले व्हावेत म्हणून त्यांनी जीवाचे रान केले. आणि स्त्री शिक्षणाच्या बाबतीत युगप्रवर्तकाचे कार्य केले.

चौथ्या प्रकरणामध्ये महात्मा फुल्यांच्या सत्यशोधकाची स्थापना व कार्य याचा अभ्यास केलेला आहे. यामध्ये प्रामुख्याने सत्यशोधक समाजाचा महत्त्वपूर्ण असलेला उद्देश, या समाजाची प्रमुख तत्त्वे आणि त्रिसूत्री कार्यक्रम हेच सामाजिक विषमता व मानसिक, धार्मिक गुलामगिरीतून मानवास मुक्त होण्यास सहाय्यभूत ठरते. सत्यशोधक समाजाच्या कार्यावरुन वाटते की हिंदू धर्मात जातीभेदाच्या नावाखाली उच्च व ब्राह्मण वर्गाकडून इतर वर्गाची परवड मोठ्या प्रमाणात होत होती. शूद्र-अतिशूद्रांबरोबर स्त्री वर्गाची ही तीच स्थिती होती. धर्माच्या नावावर अंधश्रद्धा, लोकभ्रम, वाईट चालीरीती, विवेकहीन कर्मकांड होत होती. या सर्वात स्त्री वर्ग हा प्रत्यक्ष- अप्रत्यक्ष रित्या मोठ्या प्रमाणात बळी पडत होता. या सर्व वर्गांना त्यातून मुक्त करणे हेच मुख्य उद्दीष्ट सत्यशोधक समाजाचे होते. त्यांनी स्विकारलेल्या त्यांच्या पुढील तत्वावरुन दिसून येतो.

1) ईश्वर एक असून तो सर्वव्यापी, निर्वीकार, निर्गुण व सत्यरूप आहे आणि सर्वमान व प्राणी त्याची प्रिय लेकरे आहेत.

2) ईश्वराची भक्ती करण्याचा प्रत्येक मानवास पूर्ण अधिकार आहे. आईस संतुष्ट करण्यास अग बापास विनविण्यास जशी त्रयस्थ दलालाची जरूरी नसते, त्याप्रमाणे सर्वसाक्षी परमेश्वराची भक्ती करण्यास भर दलालाची आवश्यकता नाही.

3) कोणीही जातीने श्रेष्ठ नसून गुणाने श्रेष्ठ ठरतो.

सत्यशोधक समाजामार्फत शैक्षणिक कार्यीहि मोठ्या प्रमाणात पार पाडले गेले. सत्यशोधक समाजाने मूर्तीपूजा त्याज्य ठरविली. या समाजाने सत्यशोधक विवाह पद्धत अस्तित्वात आणली. हे लग्न म्हणजे ब्राह्मण पुरोहिताशिवाय हिंदू लग्नच होते. साधी व कमी खर्चातील हि विवाह पद्धती सामान्य व तळागाळातील लोकांसाठी स्थापली. श्रीमंत वर्गाचाही पाठिंबा या समाजाला होता. शेतकऱ्यांचे प्रश्न, त्यांची कर्जे, धर्मविषी, संस्कार या नावाखाली होणारे त्यांचे नुकसान या बाबीही या समाजाने हाताळण्यास सुरूवात केली. कनिष्ठ वर्गाने आपले मानवी हक्क संपादनकरुन आपली उन्नती करावी असे आपल्या समाजाचे ध्येय विशद करताना फुल्यांनी सांगितले. या समाजाने जोतीरावांने 'गुलामगिरी' व 'ब्राह्मणांचे कसब' या दोन ग्रंथांच्या प्रती हिंदी संस्थानिक आणि समाजातील प्रतिष्ठीत लोक यांना विनामूल्य पाठविल्या. 'ब्राह्मणांचे कसब' या ग्रंथामध्ये त्यांनी ब्राह्मण या वर्गाकडून समाजातील इतर वर्गाची पारिवारिक किंवा धार्मिक शुभाशुभबाबत कशी फसवणूक होत होती ? विशेष करून कुणबी, माळी वगैरे शुद्र लोक अप्रत्यक्षपणे स्त्रियाही कशा बळी पडत होत्या त्याचे कारण अज्ञान, अशिक्षितपणा कसे आहे हे त्यातून स्पष्ट केले आहे. त्यांच्या 'गुलामगिरी' पुस्तकात भारतातील जातीभेद, वर्णानुसार, श्रेष्ठ-कनिष्ठता, हिन स्वरुपाची अस्पृश्यता हि आर्य ब्राह्मणांची देण आहे. त्यांनी आपले वर्चस्व स्थापून

शूद्रांना धनसंचय आणि ज्ञानापासून कसे वंचित ठेवले आहे. याचे विवेचन केले आहे. जोतीबांनी आपल्या उपरोक्त ग्रंथाच्या प्रती सत्यशोधक समाजाला देणगी म्हणून दिल्या. 'शेतकऱ्यांचा असूड' या ग्रंथात त्यांनी शेतकऱ्यांचे शोषण कसे होते. त्यांची स्थिती काय आहे याचे विवेचन केले आहे. 'तृतीय रत्न', 'सत्सार' यासारख्या ग्रंथामधून त्यांनी त्याकाळी समाजात पसरलेल्या विषमतेवर आणि अन्यायावर घणाघाती प्रहार केलेला आहे. सत्यशोधकद्वारे ब्राह्मणवाद्य विरोधी मोहीम उघडली. खेडूतांना शिक्षण देऊन त्यांचा अज्ञानीपणा दूर करणे, अंधश्रद्धा नष्ट करणे, पुरोहितवादाला विरोध, कर्ज काढून मूर्तीपूजा, तीर्थयात्रा करण्यास निषेध दर्शविणे अशी अनेक महत्त्वाची उद्दीष्टपूर्ण कार्ये सत्यशोधक समाजाची होती.

पाचव्या प्रकरणामध्ये जी फुल्यांच्या स्त्री मुक्ती संदर्भातील विचारांचा अभ्यास केला आहे. आपल्या लघुशोध निबंधाचा सर्वात महत्त्वाचा भाग आहे. यामध्ये फुल्यांचा स्त्रीदास्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन भिन्न होता. अकबराने योजलेल्या व प्रयत्न केलेल्या स्त्री विषयक सुधारणा व्यापक व मूलगामी कशा होत्या याचा थोडक्यात आढावा घेतलेला आहे. महात्मा फुल्यांनी स्त्री मुक्ती संदर्भातील विचारात त्यांनी स्त्री शिक्षणाला महत्त्वपूर्ण स्थान दिले आहे. 1883 साली ब्राह्मण विधवांना दुष्कीर्ती, भ्रूणहत्या, बालहत्या, आत्महत्या व पोलीसकारवाईच्या पाशापासून वाचविण्यासाठी बालहत्या प्रतिबंधक गृह ही संस्था काढली होती. त्यांनी विधवांना गुप्तपणे येऊन बाळंत व्हा. तुम्हाला हवे असल्यास मूल न्या किंवा ठेवा हे तुमच्या खुषीवर असेल अशा मुलांची काळजी हा अनाथाश्रम होईल. अशा प्रकारे त्यांनी समाजातील या अघोरी कृतीस पायबंद घालण्याचा प्रयत्न केला. पुरूष स्त्रीवर बलात्कार करून तिच्याशी विवाह बाह्य संबंध प्रस्थापित करून, तिच्या असाह्य स्थितीचा फायदा घेऊन मोहात पाडून असा गर्भ तिच्यावर लादतो तेव्हा मातृत्वापासून सूटका करून घेण्यास स्त्री असमर्थ ठरल्याने बालहत्येचा किंवा आत्महत्येचा मार्ग स्विकारते तेव्हा या स्त्रियांची दुष्टचक्रातून सुटका करण्याच्या दृष्टीने त्यांनी आपली पाऊले उचलली.

स्त्रियांना सहानुभूती म्हणून एकदोन हक्क देणे त्यांना मान्य नव्हते. तर पुरूषांप्रमाणेच माणूस म्हणून जगण्याचा मानवी हक्क व संधी तसेच पुरूषांच्या बरोबरीने समाज जीवनात स्त्रियांचे स्थान मिळावयास हवे असे फुल्यांचे मत होते. विधवा पुनर्विवाहाचा प्रश्न मुख्य करून ब्राह्मण व उच्चवर्गीयांशी निगडीत होता. पण विधवांची स्थिती, नैतिक अध:पात फुल्यांना सहन होईना. तेंव्हा विधवांची सुटका करण्याच्या दृष्टीने विधवांच्या पुनर्विवाहाची चाल सुरू करण्यासाठी प्रयत्न करू लागले. बालविवाहामुळे विधवांची संख्या वाढत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. जोतीरावांनी एका विधुराचा पुनर्विवाह एका विधवेबरोबर घडवून आणला. यावरुन त्यांनी विधवांनाही स्वत:चे जीवन जगण्याचा हक्क आहे याची जाणीव करून दिली. समाजाने पतित म्हणून तिरस्कृत ठरविलेल्या व अनवधनाने वाकडे पाऊल पडलेल्या समाजाच्या दृष्टीने पथभ्रष्ट, बहिष्कृत स्त्रीयांसाठी 1863 साली आश्रमाची स्थापना केली. त्यांना लिहण्यास व वाचण्यास शिकविण्याबरोबरच हस्तव्यवसायासारखे शिक्षण देऊन अर्थार्जनाची संधी ही निर्माण करून दिली. स्त्रीयांचा समाजातील दर्जा खालावण्याचे आणखी एक कारण म्हणजे केशवपन होय. फुल्यांनी केशवपन पद्धत संपुष्टात आणण्यासाठी 'दिनबंधू' वृत्तपत्रातून लेखमाला सुरू केली. त्यांच्या विचाराचा परिणाम म्हणून न्हावी लोकांनी सभा बोलवून विधवांचे केस कापू नयेत हा ठराव संमत केला.

इतकेच नाहीतर फुल्यांनी देवदासी पद्धती बंद करण्यासाठीही प्रयत्न केलेला आहे. त्यांनी मुंबईतील एक देवदासी विवाह मुंबई पोलीस कमिशनर मार्फत रोखण्याचा प्रयत्न केला. त्यांनी कमिशनर सावटन साहेबांना हि लग्नपद्धती मोडण्याविषयी तावडतोब खटपट करण्याची विनंती केली. स्त्रियांच्या दु:खाची व्यथा त्यांनी विविध लिखाणातून सातत्याने स्पष्ट केलेली आहे. स्त्रियांसाठी व पुरूषांसाठी असणारे एकाच बाबतीचे नियन वेगळे असणे म्हणजे फुल्यांच्या दृष्टीने निव्वळ पक्षपात होय. मूल होत नाही म्हणून फक्त स्त्रीलाच जबाबदार धरून वांझोटेपणा तिच्यावर लादणे म्हणजे निर्दयीपणा आहे असे ते

मानतात. पुरूषात दोष कशावरुन नसेल ? असाही ते सवाल करतात. म्हणूनच त्यांनी आपणास मूल बाळ होत नसेल तरी दुसरा विवाह केलेला नाही. उलट काशिबाई नावाच्या ब्राह्मण स्त्रीचे मूल दत्तक घेऊन समाजापुढे एक नवा आदर्श घालून दिलेला आहे. त्यांनी पुरूषप्रधानता आणि पितृसत्ताकतेवर प्रकाशझोत टाकून बहुजन समाजातील स्त्रियांची दडपणूकीच्या प्रश्नांची मांडणी केली आहे. जातीव्यवस्थेचा पुरूषशाहीचा पराभव करून स्त्री मुक्त होण्याच्या दृष्टीने त्यांनी धर्म, संस्कृती, रूढी यांचा उच्छेद आणि कुटुंबपद्धतीची पुनर्रचना या गोष्टीवर ते भर देऊ शकले. आपल्या एकूण आंदोलनता शूद्र अतिशूद्रांच्या प्रश्नांबरोबरच स्त्री प्रश्नास स्थान दिले होते. शिवाय त्यांचे कार्य हे स्त्री शिक्षणापुरतेच मर्यादित न राहता प्रौढ विवाह, विधवा विवाह, पतिता-परित्यक्ता यांचे बिकट प्रश्न, अनाथालये, या सर्व क्षेत्रात त्यांनी स्वत: पुढाकार घेऊनच कार्य केलेले आहे.

पाचव्या प्रकरणाच्या शेवटी ''महात्मा फुल्यांच्या कार्याचे फळ म्हणजे समाजात स्वतंत्रपणे विचार करून स्त्री मुक्तीच्या दिशेने पाऊल टाकणाऱ्या स्त्रिया'' यांचा अभ्यास केलेला आहे. शतकानुशतके असलेल्या रूढी, परंपरेस, भ्रामक कल्पनेस छेद देण्याचे काम म. फुल्यांनी केलेले आहे. त्यांनी सुरू केलेल्या स्त्रीमुक्ती कार्यास काही प्रमाणात का होईना यश आल्याचे उदाहरण या स्त्रियांद्वारे मिळते. त्याकाळात सावित्रीबाई फुल्यांप्रमाणेच पंडिता रमाबाई, ताराबाई शिंदे, आनंदीबाई जोशी, रमाबाई रानडे, लक्ष्मीबाई टिळक, काशिबाई कानिटकर, रखमाबाई, आनंदीबाई कर्वे, पार्वतीबाई इ. अनेक नावांनी 19 व्या शतकात स्त्री कर्तृत्वात भर घातली. फुल्यांनी उपदेशिलेल्या स्त्री-शूद्र सेवेच्या कार्यक्रमातील प्रत्येक तपशील रमाबाईंनी कसोशीने आणि निष्ठेने आमलात आणले. पं. रमाबाईंचे कार्य फुल्यांच्या मृत्युनंतर घडले असले तरी या लोकोत्तर स्त्रीचे तेज, मूल्य तिच्या उदयकाळातच फुल्यांना जाणविल्यामुळे त्यांनी वेळप्रसंगी त्या तरूण तेजस्विनीची व तिच्या बंडखोरीची प्रशंसा केलेली आहे. ताराबाई शिंदे या स्त्रीने

पुरूषी वर्चस्वावर 19 व्या शतकात घणाघाती हल्ला केला. 1882 ला त्यांनी पुरूषांवर आसूड ओढणारे 'स्त्री-पुरूष तुलना' हे पुस्तक लिहीले. त्यांच्यासारखी जळजळीत भाषा कोणत्याही स्त्रीने त्याकाळात वापरली नव्हती फुल्यांनी आपल्या 'सत्सार-2' या पुस्तकात पंडिता रमाबाई, ताराबाई शिंदे यांचा कौतुकाने, अभिमानाने उल्लेख केलेला आहे. पंडिता रमाबाई प्रमाणे आणखी एक घडलेली रमाबाई म्हणजे न्या. रानडेंची पत्नी रमाबाई रानडे. त्याकाळातील काशिबाई कानिटकार, लक्ष्मीबाई टिळक या स्त्रियांनी सामाजिक परिस्थितीचा विचार करून स्वतंत्रपणे लेखन केले. आनंदीबाई जोशी या पहिल्या महिला डॉक्टर होत्या. आनंदीबाई कर्वेनी 'माझे पुराण' या आत्मचरित्राद्वारे आपली व्यथा मांडली आहे. तेराव्या वर्षी लग्न होऊन नंतर सासरी जाण्याच्या वेळी नकार देणारे एक असामान्य धैर्य लोकांना 'रखमाबाई' च्या रूपात पहायला मिळाले.

अशा प्रकारच्या स्त्रिया 19 व्या शतकात होऊन गेल्या. स्त्री मुक्ती लढयाची सुरूवात या शतकात झाली याचीच ही बोलकी उदाहरणे स्त्रियांच्या या कार्यावरुन आपल्याला जमेल तशी झेपेल तशी साथ त्यांनी म. फुल्यांच्या कार्याला प्रयत्नांना दिल्याचे जाणवते. यावरुन स्त्री मुक्ती संदर्भात म. फुले प्रेरणाशक्ती बनल्याचे दिसते.

एकूण आपल्या अभ्यासातून आपण असे निष्कर्ष काढू शकतो की म. फुल्यांनी हिंदूधर्मातील रूढी परंपरेला जखडून त्याच चौकटीत राहणाऱ्या समाजव्यवस्थेविरूद्ध आवाज उठवून विरोध दर्शविलेला आहे. म. फुल्यांनी हिंदू धर्मातील दोष दाखवून त्यावर टिका करून विरोध दर्शविला. समाजसुधारणेसाठी आणि स्त्री सुधारणा व स्त्री मुक्तीसाठी प्रत्यक्ष कार्य केले. तत्कालीन समाजाची स्थिती लक्षात घेता पुरूषप्रधान संस्कृती आणि धर्माचा पगडा जबरदस्त असूनही त्यांनी दाखविलेले धाडस हे असामान्यच आहे. त्यांनी मांडलेले स्त्री मुक्ती संदर्भातील विचार व कार्य हे त्या काळात महत्त्वपूर्ण असले

तरी आज ही त्यांचे विचार तितकेच महत्त्वाचे आहेत. कारण रानडे- टिळक काळातही स्त्री विषयक स्थितीत फारसा फरक पडलेला नाही. टिळकांनी तर सनातन्यांची बाजू उचलून स्त्री हक्काला व त्यांच्या एकूण समानतेच्या भूमिकेला विरोध केल्याचे दिसते. परंतु त्यांच्या नंतर म. गांधीच्या हाती सूत्रे जाताच त्यांनी केलेल्या जन आंदोलनात स्त्रियांनी प्रथमच भाग घेतलेला दिसतो. पूर्वीच्या मानाने महिला चळवळीने एक पाऊल गांधींच्या जमान्यात पुढे पडले. असे असले तरी प्रत्यक्षात मात्र गांधीजींची स्त्री विषयक भूमिका थोड्या प्रमाणात सनातनीच होती. म. फुल्यांच्या एकूण विचाराचा प्रभाव त्याकाळातील अनेक व्यक्तीवर पडला. त्यातील एक म्हणजे संत गाडगे महाराज. कारण त्यांनी समाजसुधारण्यासाठी प्रत्यक्ष लोकांशी संपर्क साधले. प्रवचने दिली. त्यांच्या प्रवचनाचे विषय हे प्रामुख्याने अज्ञान, अंधकार, अंधश्रद्धा, दारुबंदी, प्राणीहत्या करून नये, शिक्षणाचे महत्त्व हेच असत. याचप्रमाणे राजर्षि शाहू महाराज व विठ्ठल रामजी शिंदे यांनी सत्यशोधक समाजाचे कार्य पुढे चालू ठेवले व बहुजन समाजाच्या प्रगति, विकास, उन्नतीसाठी आपले जीवन खर्ची घातल्याचे दिसते. फुल्यांच्या ज्योतीवर खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची ज्योत पेटली. त्यांनी फुल्यांना अपेक्षित असलेले सामाजिक आंदोलन एका झडपेसरशी पुढे नेले.

स्वातंत्र्योत्तर काळात म. फुल्यांच्या विचाराच्या प्रेरणेने डॉ. आंबेडकरांनी तयार केलेले हिंदू कोड विषेयक वरिष्ठ पुढाऱ्यांच्या विरोधामुळे अनेक वर्षे पडून राहीले. नंतर कसेबसे आमलात आले. त्यावेळी आंबेडकरांना आपल्या कायदेमंत्री पदाचा राजीनामा द्यावा लागला. बाबासाहेबांनी स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार करताना अनेक सभा संम्मेलन व विशेषकरून महिला परिषद, लिखाण, हिंदू कोड बिल, राज्यघटना या सर्व माध्यमातून स्त्री पुरूष समानतेचा पुरस्कार करून स्त्री शिक्षणावर प्रत्यक्ष- अप्रत्यक्षपणे भर दिला. त्यांच्या उक्तीतून कृतीतून दलीत समाज व स्त्रीयांची उन्नती अभिप्रेत होती. बाबासाहेबांच्या या कार्याकडे पाहिल्यास व विचार केल्यास स्त्री स्वातंत्र्याचा महान प्रचारक व खंबीर पुरस्कर्ता म. जोतीबा फुले

या गुरूंचा आदर्श त्यांना प्रेरक ठरला असे म्हणणे गैर होणार नाही. यावरुन मागासलेली स्त्रियांची परिस्थिती व पुरूषप्रधानता याचा पगडा दिसून येतो. वेगवेगळ्या कालखंडात समाजात विविध बदल होत गेले तरी स्त्री पूर्णपणे मुक्त झाली नाही. 21 व्या शतकातील भारतीय स्त्री समस्या आजही गंभीर असलेली दिसते. त्याकाळात फुल्यांनी जेवढे प्रयत्न केले त्या प्रमाणात आजचे प्रयत्न कमी पडतात. विवाहीत स्त्रीचे जीवन आज हुंड्याने अस्ताव्यस्त झाले आहे. हुंड्यासाठी मारहाण व शारीरिक आघात स्त्रियांनाच सोसावे लागतात. त्यामुळे असा त्रास टाळण्यासाठी काहींना आत्महत्येचा मार्ग योग्य वाटतो. मंजुश्री सारडा या स्त्रीचा उशीने श्वासोच्छवास बंद पाडून खून केला जातो. सातारा रोड येथील सौ. पूजा सेठी हि स्त्री जाळून मेली की मारली असा प्रश्न निर्माण होतो. अशी हुंड्याची परिस्थिती आजही मोठ्या प्रमाणात आहे. यासाठी विविध प्रकारांनी विवाहितेचा छळ केला जातो.

फुल्यांनी बालहत्याप्रतिबंधक गृह सुरू केले ते बालहत्या होऊ नये म्हणून. पण आज विविध कारणांनी लहान बालकांच्या मृत्युचे प्रमाण अधिकच आहे. 1970 साली मुलांचे मृत्युचे प्रमाण 51.7 व मुलींचे प्रमाण 55.1 होते. तर 1992 साली मुलांचे 24.9 व मुलींचे 28.2 होते. यामध्ये मुलींच्या मृत्युचेच प्रमाण जास्त असल्याचे आढळते. याचे कारण ती मुलगी म्हणून दुर्लक्षित केली जाते. किंवा तिच्याकडे काळजीपूर्वक लक्ष न देणे, अगर बालकांवर योग्य उपचार न करता अंधश्रद्धेला बळी पडणे हे असू शकते. 1992 साली सर्व वयातील स्त्री-पुरूषांमध्ये मृत्युचे प्रमाण पुरूषांचे 10.1 तर स्त्रीचे 10.2 होते. यावरुन स्त्रीयांच्या मृत्युचे प्रमाण अधिक आढळते. याचे कारण आजही स्त्रीवर केले जाणारे अन्याय व अत्याचार हे असू शकते. [1]

विधवांचे पुनर्विवाह त्यांचे प्रश्न म. फुल्यांनी प्रत्यक्ष सोडविण्याचे कार्य केले. पण आजही समाजात धार्मिक कार्यात विधवांना वगळले जाते. विधवा स्त्री म्हणजे आपल्याच उपभोग्याची वस्तू असे

समजणारे पुरूष ही समाजात कमी नाहीत. तीला कायद्याने मिळणारी तिची मालमत्ता दिली जात नाही. ह. ना. आपटे यांच्या 'पण लक्षात कोण घेतो' अशा कादंबऱ्यातूनही विधवांच्या वास्तवतेचे दर्शन घडते. अलीकडे एकूण लोकसंख्येच्या तुलनेने सर्व वयोगटातील स्त्री पुरूषांचे प्रमाण पुढील प्रमाणे आढळते. लग्न न करणाऱ्या स्त्रिया 55.3% व पुरूष 46.1%, विवाहित स्त्रिया 44.2% पुरूष 45.7 विधवा, विधूर, घटस्फोटित, विभक्त, पुरुष सहजपणे लग्न करू शकतात किंवा करतात. समाज त्यांना सहज स्विकारतो. मात्र अशा स्त्रियांना समाज विवाहासाठी म्हणून फारच कमी प्रमाणात स्वीकारतो. आजही विधवांना स्विकारण्याची तयारी हि समाजात कमी प्रमाणातच दिसते. समाजातील काही भागात, वर्गात बालविवाह अजूनही होतात. त्यामुळे त्याचे पूर्ण उच्चाटन झाले आहे. असे म्हणता येणार नाही.

या शिवाय घटस्फोटीत, विभक्त, परित्यक्ता स्त्रियांचा प्रश्न, स्त्री शरीर विक्रेत्या-वेश्यांचा प्रश्न, प्रौढ कुमारी, कुमारी माता, बलात्कारीत स्त्रिया, शारीरिक व्यंग्य, कुंडली, वराबद्दलच्या अपेक्षा स्त्री अर्भक असेल तर गर्भपात करून घेणाऱ्यांची संख्या यांचे वाढते प्रमाण व प्रश्न आजही आहेत. म. फुल्यांनी उपेक्षिल्या गेलेल्या वर्गातील स्त्रियांकडे गंभीरपणाने पाहिले. त्यासाठी त्यांनी उदारमतवादी दृष्टीकोनातून आपले विचार केल्याचे दिसते. राजस्थानमध्ये रूपकंवर या स्त्रीला लोकांनी जबरदस्तीने सती जाण्यास भाग पाडून ती स्वखुशीने सती गेल्याचे भासविले. म. फुल्यांच्या काळातील स्थिती आणि आजच्या काळातील उदाहरण पाहून समाज अजून मागासलेला आहे हे दिसून येते.

म. फुल्यांनी स्त्रीला पुरूषांपेक्षाही उच्च स्थान दिले आहे. परंतु आज तिला बरोबरीने स्थान मिळते का ? आजही गर्भपातात स्त्री अपत्यांचेच प्रमाण जास्त असल्याचे दिसते. याचा परिणाम म्हणजे दिवसेंदिवस स्त्रियांची संख्या कमी होत चालली आहे. बिजींग मध्ये 1995 साली झालेल्या जागतिक महिला परिषदेत प्रसिद्ध झालेल्या भारतातील आकडेवारी नुसार 1981 साली दर 1000 पुरूषांमागे स्त्रियांचे प्रमाण

934 होते तेच 1991 साली 927 झाले आहे. [3] यावरुन स्त्रियांची संख्या कमी कमी होताना आढळते. आजही स्त्रियांना समाजातील अत्याचारांना बळी पडावे लागते. भारत सरकारने या बाबतीत प्रसिद्ध केलेली आकडेवारी म्हणजे प्रत्येक 7 व्या मिनिटाला महिलांशी संबंधित अत्याचाराची घटना घडते. प्रत्येक 43 व्या मिनिटाला एका महिलेचे अपहरण होते. प्रत्येक 26 व्या मिनिटाला महिला जाळली जाते. प्रत्येक 41 व्या मिनीटाला महिलेची छेडछाड केली जाते. [4] महिलांवरील हे अत्याचार कुठेही घडतात. ही संख्या म्हणजे नोंद झालेल्या गुन्ह्यांचे प्रमाण होय. प्रत्यक्षात नोंद न होणाऱ्या गुन्ह्यांची संख्या हि मोठ्या प्रमाणातच असेल. तैला होणाऱ्या गुन्ह्यांची संख्या हि मोठ्या प्रमाणातच असेल. तैला दिवसेंदिवस अत्याचाराला बळी पडावे लागते पण त्यासाठी न्याय दिला जात नाही. उदा. राजस्थानमध्ये भवरीदेवीवर पाच निर्दयी पुरुषांनी बलात्कार केला. तिला न्याय मिळालाच नाही. परंतु बलात्कार करणाऱ्यांच्या पाशवी कृतीचे समर्थन मात्र राजस्थानच्या उच्च न्यायालयाने केलेले दिसते. उच्च, मध्यम, अस्पृश्य अशा सर्व स्तरातील स्त्रियांवर राजरोसपणे असे अत्याचार घटनाना दिसतात.

आज विज्ञान युगात पाऊल टाकणारा आपला देश अजून जुन्या कल्पनांमध्येच असलेला आढळतो. 1998 चे नोबेल पुरस्कार विजेते भारतीय अर्थशास्त्रज्ञ अमर्त्यसेन यांनीही आपले विचार व्यक्त करताना भारतीय समाजातील आर्थिक सिथती खालवण्याशी व जवळचा संबंध आहे. यासाठी त्यांनी 'सक्तीचे प्राथमिक शिक्षण' हि उपाय योजना सुचविली आहे. स्त्री पुरूषांना समानतेची परिस्थिती निर्माण करण्याची गरजही त्यांनी स्पष्ट केली आहे. फुल्यांनी 100 वर्षापूर्वी याच योजनेचा आग्रह धरला होता. व तो कृतीत ही उतरवलेला होता.


एकंदरीत म. फुल्यांनी स्त्री समस्या, शूद्र अतिशूद्र यांचे प्रश्न, विधवा विवाहास प्रोत्साहन, जातीभेदाचे खंडन, अस्पृश्यता निर्मुलन, अंधश्रद्धा, वाईट चालीरिती, प्रथा, रूढी, परंपरा

बालहत्या प्रतिबंध शेतकऱ्यांचे प्रश्न अशा समाजातील सर्व प्रकारच्या समस्या सोडविण्यासाठी प्रत्यक्ष कार्य केले. या संदर्भात त्यांनी मांडलेले विचार आजही प्रस्तुत आहेत. आजच्या स्त्री समस्या व प्रश्न सोडविण्यासाठी स्त्री अभ्यास केंद्राना व यासारख्या संघटनांना दिशादर्शन करणारे ठरतात.

म. फुल्यांचे एकूण विचार व कार्य पाहता त्या काळातील त्यांची स्त्री प्रश्नांची भूमिका आजही महत्त्वपूर्ण असलेली दिसून येते. त्यांनी धर्म जाती नुसार नव्हे तर संपूर्ण समाजामध्ये स्त्रीचे शोषण कसे होते याची मांडणी केली आहे. त्यासाठी त्यांनी कुटुंबपद्धतीच्या पुनर्रचनेचा कार्यक्रम सुचविला आहे. त्यांनी त्यांच्या समग्र विचारामध्ये स्त्री विषयक विचार स्पष्ट केले आहे. त्यांच्या स्त्रीविकास सुधारणेच्या प्रयत्नाने आजची स्त्री प्रत्येक क्षेत्रात पुढे जाऊ शकली. यासाठीच आजही स्त्री विषयक दृष्टीकोन बदलण्यासाठी त्यांच्या असमान्य कार्यामुळे त्यांच्या स्त्रीविषयक दृष्टीकोनाचा अभ्यास मोठ्या प्रमाणात होण्याची गरज भासत आहे. शंभर वर्षाच्या कालांतरानेही आज त्यांच्या उदारमतवादी स्त्रीवाद विचारांची आवश्यकता व उपयुक्तता पटते. आणि म्हणून त्यांच्या स्त्री विषयक कार्याकडे व विचाराकडे पाहिल्यास त्यांनी स्त्री विषयक केलेले कार्य हे पूर्णपणे उदारमतवादी स्त्रीवादातीलच असलेले दिसून येते. असे असले तरी इतर स्त्रीवाद्यांसाठीही त्यांचे विचार तेवढेच उपयुक्त ठरू शकतात.

# DEATH RATES (0-4 years)

*(Annual per '000 population)*




# DEATH RATES (All Ages)

*(Annual per '000 population)*





Fig. IV आवृती क्र ४



MARITAL STATUS
POPULATION
W/D/S
0-14 1.3 0.0 0.0
15-19 30.1 0.2
20-24 59.4 74.8 57.2 0.3
25-29 7.6 26.7 90.3 81.1 0.8
30-34 2.7 9.2 6.1 93.6 1.4
35-39 1.2 3.6 2.4 92.7 2.0
40-44 0.6 1.9 1.3 89.5 3.3
45-49 0.4 1.4 0.9 84.0 5.0
50-54 0.3 1.2 0.8 75.6 7.3
55-59 0.3 1.0 0.7 10.2
50+ 0.3 1.1 0.7 14.6
60+ 0.2 0.9 0.6 67.2 62.2
All Ages 55.3 46.1 50.8 43.9 2.5 8.2

Fig. VII

## : संदर्भ सूची :


| | | |
|---|---|---|
| 1. | Contry Report- | New Delhi 23 .8.1995, P.N. 13<br>Fig- IV |
| 2. | कित्ता | उपरोक्त<br>P.N. 15 Fig- VII |
| 3. | कित्ता | उपरोक्त , पृ. क्र. 10 |
| 4. | संपादक - सुभाष एल् . लुंकड - | जैन संदेश<br>महावीर प्रिंटर्स, पुणे अंक. 2<br>ऑक्टोबर 97, पृ. क्र. 26 |


****